# <u>जाहीर अवाहन</u>

राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत नाविन्यपूर्ण कुक्कुट उत्पादकता कार्यक्रमा व्दारे मांसल पक्षी वाटप करुन कुक्कुट व्यवसायास प्रोत्साहन देणे अंतर्गत उस्मानाबाद जिल्हयातील कमी मानव निर्देशांक असलेल्या भूम आणि वाशी या दोन तालुक्यामध्ये ही योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

**1)भूम तालुक्यातील-**सुकटा,भवानवाडी,डुक्करवाडी,पाडोळी,घाटनांदुर,रामकुंड,चांदवड,दिंडोरी,हिवरा, हांडोग्री, वाकवड, सोनगिरी,अरसोली,वंजारवाडी,देवळाली,म्हात्रेवाडी,सावरगाव.डा, भोनगिरी.

**2) वाशी तालुक्यातील-** पारा, फक्राबाद, डोगरवाडी, सारोळा मा, मांडवा, पिंपळगाव लि, दसमेगाव, दळवेवाडी, बावी, सेलु, घोडकी, पिंपळवाडी, सारोळा वा. सोनारवाडी, पिंपळगाव को, सोनेगांव या गावात ही योजना राबवावयाची आहे.

सदर योजनेमध्ये 600 मांसल पक्षी (Broiler Birds) प्रति लाभार्थी 150 पक्षी एका वेळी असे 3 महिन्याच्या अंतराने 4 टप्यात 200 लाभार्थ्यांना पिल्लाचा व 6 आठवडे वयापर्यत खाद्य पुरवठा करणे या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. सदर पक्षी वाटप करण्यासाठी जिल्हयातील कुक्कुटपालनाशी संबधीत असलेल्या अनुभवी व्यक्ती, कुक्कुट पालन विश्वस्त संस्था, कुक्कुट पालन बचत गट, कुक्कुट पालन सहकारी संस्था, कुक्कुट पालन अशासकीय संस्था यांचेपैकी एकाची स्थानिक मध्यस्थ म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे.

तरी वरीलप्रमाणे कुक्कुट पक्षी व कुक्कुट खादय वाटप करु इच्छिणाऱ्या जिल्हयातील मध्यस्थानी दिनांक- 22/1/2021 ते 29/1/2021 पर्यत कार्यालयीन वळेत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, कार्यालय उस्मानाबाद (आनंद नगर जनावराचा दवाखाना आवार) येथे अर्ज करावे. व कार्यालयाची तांत्रिक शाखा-1 ची पोंहच घ्यावी. इतरत्र दिलेले अर्ज चिरात घेतले जाणार नाही. असे अवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त उस्मानाबाद हे करित आहेत.

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**उस्मानाबाद**

नियम व अटी खालीलप्रमाणे

1) अर्जदाराने या जाहिरातीचा संदर्भ घेवून जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त उस्मानाबाद यांचे नांवे रु.225000/- (रु. दोन लाख पंचेवीस हजार) इतक्या रक्कमेचा धनाकर्ष (डी.डी) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. धनाकर्ष न जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.
2) कुक्कुटपालनाशी संबधीत ब्रॉयलर ट्रेडींग करणाऱ्या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल
3) मोठया पक्षांचा मोबदला त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा किमान 20 टक्के जास्त असने अनिवार्य असेल.
4) पक्षी मोठे झाल्यानंतर उचल न केल्यास संबधीत संस्थेस/यंत्रणेस / पुरवठादारानी अनामत रक्कम जप्त करुन आवश्यक शासकीय दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
5) एकदिवसीय पिल्ले व खादय वाटप प्रत्यक्ष लाभार्थ्याच्या दारापर्यत पोहच करावे लागतील.
6) खादयाचा दर प्रति किलो रु.30/ (रु.तीस फक्त) इतके राहील.
7) एक दिवसीय मांसल कुक्कट पील्लू प्रति पील्लू दर रु. 25/-(पंचेवीस फक्त) इतके राहील.